# नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक

**Nashik Metropolitan Region Development Authority, Nashik**

सर्व्हे नं.६४८/ब २, फा. प्लॉट नं. ३११ पै., जैन मंदिराजवळ, राका कॉलनी,
नाशिक – ४२२ ००२ (दूरध्वनी : ०२५३-२९५९७८७) email : nmrda.nsk@gmail.com


## सूचना

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(२) च्या अनुषंगाने कलम २३(१) नुसार नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक क्षेत्राची विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणेबाबत.**

शासनाचे नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. एमआरडी -३३१६ / प्र.क्र.१०२ / नवि-७, दि. ०१/०३/२०१७ नाशिक महानगर क्षेत्रासाठी, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थपना करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(२) अन्वये प्राधिकरण क्षेत्राचा नियोजनबध्द विकास होण्यासाठी त्या क्षेत्राची विकास योजना तयार करणे आवश्यक आहे.

शासन नगर विकास विभागाची अधिसूचना क्र.टीपी एस-१११७/२१२/प्र.क्र.१०६/२०१७/नवि-९, दि. १२ जानेवारी २०१८ अन्वये नाशिक महानगर क्षेत्रासाठी नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची " विषेश नियोजन प्राधिकरण" म्हणुन नियुक्ती केलेली आहे.

सबब, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(२) च्या अनुषंगाने कलम २३(१) अन्वये , नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने प्राधिकरण क्षेत्राची विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यासाठी ठराव क्र.०४, दि. २२ .०९.२०२५ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार सदरची सूचना प्रसिध्द करण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(२) नुसार नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या विकास योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राची हद्द दर्शविणारा नकाशा प्राधिकरणाच्या कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आलेला आहे.

ज्या नागरिकांच्या याबाबत काही सूचना/ हरकती असतील त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द होईल त्या तारखेपासून ६०(साठ) दिवसाच्या आत महानगर आयुक्त, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक यांचेकडे लेखी स्वरूपात द्याव्यात. विकास योजना तयार करतांना त्या सूचनां/हरकतींचा योग्य तो विचार करण्यात येईल.

(डॉ माणिक गुरसळ भा प्र से )
**महानगर आयुक्त,**
**नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**नाशिक**

जा.क्र.नामप्रविप्रा/वियो/क-२३(१) सूचना/१०७४
नाशिक
दिनांक : २२.०९.२०२५

Nashik Metropolitan Region Development Authority
Nashik

वियोटिपणी १०.०९.२०२५




# PLAN SHOWING THE BOUNDARY OF NASHIK METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY, NASHIK.

(AREA OF INTEREST)

U/S 23(1) OF MR&TP ACT, 1966

LEGEND

| | |
|---|---|
| NMRDA BOUNDARY | |
| MUNICIPAL AREA | |
| TAHASAIL BOUNDARY | |
| DRDO AREA | |

METROPOLITAN COMISSIONER

METROPOLITAN PLANNER

DEPUTY METROPOLITAN PLANNER

PREPARED BY:- PRASHANT AHER (A.D.M.)

ASSISTANT METROPOLITAN PLANNER

NASHIK METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY